# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०११ – १२

## स्पर्धा परीक्षा विभाग

पुण्यनगरी
www.punyanagari.in
www.facebook.com/punyanagari.pune
पुणे ◆मंगळवार, २५ सप्टेंबर २०१२
५

# स्पर्धा परीक्षांसाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक : नाईकडे

राजगुरूनगर/प्रतिनिधी

ज्ञान, कष्ट व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांत यशस्वी व्हावे, असे मत राज्याचे सामाजिक व न्याय विभागाचे सचिव रंगनाथ नाईकडे यांनी राजगुरूनगर येथे व्यक्त केले.



महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या शैक्षणिक धोरणांतर्गत पुणे जिल्हा सहकारी बोर्ड, सहायक निबंधक सह. संस्था, खेड आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवक-युवती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे सामाजिक व न्याय विभागाचे सचिव रंगनाथ नाईकडे यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी पुणे जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, खेड तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राजगुरूनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रताप आहेर, साई शिंदे, संचालक शांताराम घुमटकर, बबनराव पाटोळे, वामन टाकळकर, शांताराम देशमुख, पी. टी. शिंदे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्रा. डॉ. संजय शिंदे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. पी. के. कोरडे, प्रा. जी. एल. भोर, प्रा. व्ही वाय. रणपिसे, प्रा. दिलीप मुळूक यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रंगनाथ नाईकडे पुढे म्हणाले, इच्छाशक्तीच्या जोरावर तरुणांनी आपले ध्येय गाठावे. आवडीचे क्षेत्र निवडून त्यात प्रावीण्य मिळवावे. स्वत:चे मूल्यमापन करावे. त्यातून प्रगतीकडे जाता येते. महाविद्यालयीन जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांकडे कल असावा. महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोग याबाबतच्या अभ्यासक्रमांचे बदलते स्वरूप, सहकार क्षेत्राकडे युवकांचा सहभाग आणि स्थान, रोजगारनिर्मिती याबाबतही नाईकडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विलास लिंबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एच. एम. जरे यांनी केले. प्रा. डॉ. टी. जी. गीते यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख